स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड पीएच. डी पदवीसाठी संकलित
शोध प्रबंधाची रूपरेषा

१९९० नंतरचे मराठी ललित साहित्यः एक चिकित्सक अभ्यास
(विशेष संदर्भ डॉ. जनार्दन वाघमारे यांचे ललित साहित्य.)

संशोधक

रतन अंबादास कराड
जि.प. हा. हदगाव
ता. हदगाव जि.नांदेड
मो.नं. ८८५५८८५७७९/७०८३६७४८८४

मार्गदर्शक

डॉ. मा. मा. जाधव
मराठी विभाग
हुतात्मा बहिर्जी स्मारक महाविद्यालय वसमत

शैक्षणिक वर्ष २०२४-२५

१९९० नंतरचे मराठी ललित साहित्य: एक चिकित्सक अभ्यास
(विशेष संदर्भ डॉ. जनार्दन वाघमारे यांचे ललित साहित्य)

प्रास्ताविक :

मराठी साहित्याला हजारो वर्षाची (अनेक वर्षाची) परंपरा आहे. मराठी साहित्याचा अभ्यास करताना प्राचीन, मध्ययुगीन, अर्वाचीन, आधुनिक, स्वातंत्र्योत्तर अशा विविध कालखंडा अधारित अभ्यास केला गेला आहे. त्याच प्रमाणे संत साहित्य, पंत साहित्य, बखर वाङ्मय, शाहीरी वाङ्मय, भाषांतरित, रूपांतरित अशा ही संबोधनाने प्रवृत्ती दर्शक, दृष्टीकोनातून विचार केलेला आहे. तसेच आधुनिक नवसाहित्य, परिवर्तनवादी, जनवादी, अस्तित्ववादी, स्त्रीवादी , ग्रामीण, दलित, आदिवासी इ. प्रवाह दर्शक दृष्टीकोनातून ही पाहिले जाते.

मराठी साहित्यात अनेक वाङ्मय प्रकार आढळतात. तत्वज्ञानपर, आख्यानपर, कथा काव्य, पंडिती रचना, अभंग, बटवर, पोवाडे, लावण्या, कुटरचना हे जसे आढळतात . त्याच प्रमाणे शालेय भाषांतरीत, रुपांतरीत साहित्य, निबंध, लघु- निबंध, ललित निबंध, कविता, नाटक, कथा, कादंबरी, चरित, आत्मचरित्र, राजकीय, वैचारिक लेखन, अशा बहुविध वाङ्मय प्रकारांनी मराठी साहित्य समृद्ध झालेले दिसते.

मराठी साहित्यात मुकुंदराज, ज्ञानेश्वर, चक्रधरस्वामी म्हाइंभट्ट, नरेंद्र पंडित, भास्कर भट्ट, बोरीकर, दामोदर पंडित, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत रामदास यांच्या बरोबर संत जनाबाई, कान्होपाटी, बहिणाबाई अशा अनेक संत कवियत्री ही साहित्यात भर घातलेल्या दिसतात. शाहीर, बखरकार, यांनीही मराठी साहित्याचे दालन समृध्द केले आहे.

आधुनिक काळात केशवसुत, गोविंदाग्रज, खाडीलकर, अत्रे, वा.रा.कांत, शिरवाडकर, मर्ढेकर, गंगाधर गाडगीळ, माडगुळकर, भावे अशा अनेक साहित्यिकांनी मराठी साहित्य समृध्दीत मोलाची कामगिरी केली आहे.

१९६० नंतर मराठी साहित्यात विविध वाङ्मयीन प्रकार निर्माण झाले . दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी, आदिवासी, अस्तित्ववादी असे लक्षणीय प्रवाह निर्माण झाले. वेगवेगळे वाङ्मय प्रकार समृध्द होत असताना कथा कादंबऱ्या बरोबर ललित लेखनाचा ही प्रकार अस्तित्वात आला.

१९७५ नंतर या लेखनाला वेग आला. सुरुवातीला स्फूट लेखांच्या माध्यमातून कलात्मक, ललित प्रबोधनपर, माहितीपर, रंजनपर असे लेखन झाले. या लेखनाची सुरूवात लघुनिबंध, गुजगोष्ट, ललितगय, ललित लेख, मुक्त निबंध असे वेगवेगळ्या रुपाने अविष्कृत झालेले दिसते. या प्रकारचे लेखन करणारे साहित्यिक- दुर्गा भागवत, इरावती कर्वे, रा.भी. जोशी, प्रभाकर पाध्ये, माधव आचवल, मंगेश पाडगावकर, विंदा करंदीकर, सुभाष भेंडे,

रत्नाकर मतकरी, मारुती चितमपल्ली, अनिल अवचट, उत्तम कांबळे असे किती तरी लेखक आढळतात.

प्रस्तुत संशोधनात डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या ललित लेखनाचा अभ्यास करावयाचा आहे.

विषय निवड :

मराठी साहित्यातील ललित साहित्याचा अभ्यास करावयाचा आहे. 1990 नंतरच्या ललित साहित्याचा आढावा घेऊन डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या ललित साहित्याचा चिकित्सक अभ्यास करावयाचा आहे. या अभ्यासात मराठी साहित्यातील ललित साहित्य लिहिणाऱ्या प्रतिभावंत लेखकाच्या साहित्य कृतींचा ही विचार केला जाणार आहे.

डॉ. जनार्दन वाघमारे हे मुळात इंग्रजी साहित्याचे अभ्यासक आहेत. त्यांनी साहित्याकडे सामाजिक उन्नयाचे साधन म्हणून पाहिले आहे. ते बहुआयामी व्यक्तिमत्व आहेत . राजकीय, सामाजिक, शैक्षणिक विषयावर लेखन केले आहे. तसेच पाश्चात्य साहित्याचा सखोल अभ्यास ही केला आहे. त्यामुळे त्यांची साहित्याकडे, समाजाकडे पाहण्याची जीवन दृष्टी अतिशय व्यापक स्वरूपाची आहे. ते परिवर्तनवादी विचारवंत आहेत. साहित्याकडे पाहताना समाज आणि व्यक्ती यास केंद्रिभूत ठेवून विचार करताना आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हटले आहेत की मराठी भाषेचा व साहित्याचा मी नम्र पाईक आहे - ही भूमिका ठेवूनच लेखन केले आहे. पुढे म्हणतात,"माणूस हाच साहित्याचा केंद्रबिंदू आहे आणि असला पाहिजे". संस्कृतीचा विकास हा साहित्यातून होत असतो. ती माणसाच्या जीवनाचे उन्नयन करते. हे सांगून माझ्या साहित्य निर्मितीचा सामाजिक व सांस्कृतिक अनुबंध आहे. यावरून त्यांची बांधिलकी, दृष्टीकोन लक्षात येतो. त्यांनी विपूल साहित्य निर्मिती केली आहे. परंतू, प्रस्तुत संशोधनात त्यांच्या ललित साहित्याचाच विचार करावयाचा आहे. म्हणून हा विषय निवडला.

विषयाचे महत्त्व :

डॉ. जनार्दन वाघमारे यांनी विपुल साहित्य लेखन केले आहे. त्यात संशोधनात्मक, चरित्रात्मक, वैचारिक, शैक्षणिक, प्रवासवर्णनात्मक, आत्मकथनात्मक, दलित साहित्याची मीमांसा, ललित लेख, व्यक्तिचित्रणात्मक अशा विविध विषयावर 65 से 70 ग्रंथ प्रकाशित झालेले आहेत. या सर्वांचा अभ्यास करणे अशक्य आहे.

प्रस्तुत संशोधनात डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या ललित साहित्याचा विचार करावयाचा आहे. या साहित्यामागील प्रेरणा, भूमिका लक्षात घेऊन चिकित्सा करावयाची आहे.

सदरच्या विषयावर फारसा अभ्यास झालेला नाही. त्यामुळे या विषयास विशेष महत्त्व राहील. या विषयाच्या अनुषंगाने 1990 नंतरच्या ललित साहित्याचा विचार केला जाणार आहे. या अभ्यासाचा उपयोग पुढील संशोधकास ही होऊ शकतो.

एकाच लेखकाने हाताळलेले विविध विषय, त्या मागील त्याची भूमिका या दृष्टीनेही हा अभ्यास महत्त्वाचा ठरु शकतो.

पूर्व संशोधन :

मराठी साहित्यात विविध वाङ्मय प्रकार समृध्द झाले असल्यामुळे त्या वाङ्मय प्रकारावर बऱ्याच अभ्यासकांनी अभ्यास केला आहे. त्याची चर्चा, संशोधन केले आहे. अनेक ग्रंथ ही लिहिले आहेत. परंतु डॉक्टर जनार्दन वाघमारे यांच्या ललित साहित्यावर मुलभूत असे संशोधन झाले नाही. काही मासिकातून, नियतकालिकातून स्फूट असे समीक्षात्मक लेखन केले आहे. त्यात ही डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या साहित्यावर खूपच कमी चर्चा झालेली आहे. कारण डॉ. जनार्दन वाघमारे हे ललित साहित्यिक पेक्षा वैचारिक शिक्षण तज्ञ प्रशासकीय इत्यादी दृष्टीकोनातून अधिक ओळखले जातात . त्यांच्या या ललित साहित्याकडे दुर्लक्ष झालेले आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अभ्यासच महत्त्वाचा ठरणारा आहे.

संशोधनाची उद्दिष्टये :

• १९९० नंतरचे मराठी ललित साहित्यः एक चिकित्सक अभ्यास. विशेष संदर्भ डॉ. जनार्दन वाघमारे यांचे ललित साहित्य ' हा संशोधन विषय असल्यामुळे प्रस्तुत विषयाची उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत.

१) मराठी ललित साहित्याचा परिचय करून घेणे. प्रवाहाचा आढावा घेणे.

२) ललित साहित्य लेखनाची वैशिष्ट्ये नोंदविणे.

३) १९९० नंतरचे मराठी ललित साहित्य प्रवाहाची वैशिष्ट्ये नोंदविणे.

४) डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या ललित साहित्याची प्रेरणा व स्वरूप जाणून घेणे.

५) डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या एकूण लेखनाची वैशिष्ट्ये जाणून घेणे.

६) डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या ललित साहित्याचे अभिव्यक्ती सामर्थ्य जाणून घेणे.
अशी या संशोधनाची उद्दिष्ट्ये आहेत.

संशोधनाची गृहीत कृत्य :

१) मराठी साहित्यातील ललित साहित्य हे लक्षवेधी, लक्षणीय आहे.

२) १९९० नंतरच्या ललित साहित्य प्रवाहाने मराठी साहित्य समृध्द बनले आहे.

३) डॉ. जनार्दन वाघमारे यांचे ललित साहित्य सामाजिक बांधिलकीच्या भूमिकेतून लिहिलेले आहे.

४) डॉ. जनार्दन वाघमारे यांचे ललित साहित्य सामाजिक परिवर्तनाला महत्त्व देणारे आहे.

५) डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या ललित साहित्यात आलेले विषय व आशय वर्तमान काळाच्या समाज घडणीस उपयुक्त आहेत.

६) डॉ. जनार्दन वाघमारेचे ललित साहित्य हे प्रेरक व प्रबोधन करणारे आहे.

७) डॉ. जनार्दन वाघमारे यांचे ललित साहित्य संख्यात्मक दृष्टीने कमी असले तरी गुणात्मक अधिक आहे.

८) डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या ललित साहित्यातून त्यांचा मानवतावादी दृष्टीकोन, जीवनवादी दृष्टीकोन प्रामुख्याने जाणवतो.

९) डॉ. जनार्दन वाघमारे यांचे ललित साहित्य सामाजिक प्रवाहाला दिशा देणारे साहित्य आहे.

संशोधन पध्दती :

संशोधन क्षेत्रात संशोधनाच्या अनेकविध पध्दती उपलब्ध आहेत. वर्णनात्मक, वैज्ञानिक, उपयोजित, प्रायोगिक, नमुना निवड वगैरे, अशा अनेक संशोधन पध्दती उपलब्ध असल्या तरी संशोधनात सर्वच संशोधन पध्दतीचा वापर करता येत नाही. विषय आणि आशयाच्या स्वरुपानुसार संशोधन पध्दतीचा वापर करावा लागतो.

प्रस्तुत संशोधन विषय 1990 च्या नंतरचे मराठी ललित साहित्य: एक चिकित्सक अभ्यास, विशेष संदर्भ डॉ. जनार्दन वाघमारे यांचे ललित साहित्य असल्यामुळे या अनुषंगाने

वर्णनात्मक, विश्लेषणात्मक, मुलाखत या संशोधन पध्दतीचे उपयोजन करणार आहे. तसेच संशोधनाला आवश्यक असणाऱ्या संशोधन पद्धती ही साह्याला घेतल्या जातील.

या संशोधनासाठी लेखकाची साहित्य सामुग्री, विविध ग्रंथाचा संदर्भ, ग्रंथाचे साहय घेत असल्यामुळे वर्णनात्मक व विश्लेषण पध्दती बरोबर इतर विविध संशोधन पध्दतीचा आधार घेतला जाईल.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादाः

प्रस्तुत संशोधन विषय 1990 नंतरचे मराठी ललित साहित्य : एक चिकित्सक अभ्यास असल्यामुळे 1990 पासूनच्या साहित्याचा अभ्यास आणि विशेष संदर्भ डॉ. जनार्दन वाघमारे यांचे ललित साहित्य असा असल्यामुळे या संशोधन विषयाची व्याप्ती आणि मर्यादा या विषयापुरतीच आहे.

संशोधनासाठी आधारभूत ग्रंथ :

१) १९९० नंतरच्या कालखंडातील विशेष लक्षणीय साहित्य कृती.

२) डॉ. जनार्दन वाघमारे यांचे साहित्य.

३) डॉ. जनार्दन वाघमारे यांचे ललित साहित्यकृती.

- जीवनरेखा
- व्यक्तिवलये
- व्यक्तित्व आणि कर्तृत्व
- व्यक्तिरंग
- मातीवरच्या ओळी
- मंथन
- व्यक्तिवेध

संशोधनाचे प्रारूप :

शीर्षक - १९९० नंतरचे मराठी ललित साहित्यः एक चिकित्सक अभ्यास - विशेष संदर्भ डॉ. जनार्दन वाघमारे यांचे ललित साहित्य

१) मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप

२) १९९० नंतरच्या ललित साहित्याच्या प्रेरणा व स्वरूप
३) ललित साहित्याची व्याख्या, स्वरूप व वैशिष्ट्ये
४) १९९० नंतरचे ललित साहित्यिक व साहित्यकृतीचा परिचय
५) डॉ. जनार्दन वाघमारे व्यक्तित्व आणि साहित्य
६) डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या ललित साहित्याची प्रेरणा व स्वरूप
७) डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या ललित साहित्याची वैशिष्ट्ये
८) निष्कर्ष

संदर्भ ग्रंथ :

१) प्रभा गाणोरकर, जया टाकळकर (संपादक)
मराठी वाङ्मयकोश, (१९२०-२००३)
ग.रा. भटकर फाऊंडेशन, मुंबई
पुनमुद्रित - २०१३

२) जया दडकर, प्रभा गाणोरकर (संपादक)
मराठी वाङ्मयकोश,
(आरंभ - १९२० पर्यंत)
ग.रा. भटकळ - पुनमुद्रित-२०१३

३) अविनाश डोळस - आंबेडकरी चळवळ; परिवर्तनाचे संदर्भ
सुगावा प्रकाशन पुणे
प्रथम आवृत्ती - १९९५

४) डॉ. ऋषीकेश कांबळे - दलित कविता आणि अमेरिकन ब्लॅक पोएट्री
गोदा प्रकाशन औरंगाबाद
प्रथम आवृत्ती - १९१२

५) दत्ता भगत - दलित साहित्य दिशा आणि दिशांतर
अभय प्रकाशन नांदेड
प्रथम आवृत्ती - १९१२

६) रा.ग. जाधव - निवडक समीक्षा
पद्मगंधा प्रकाशन

प्रथम आवृत्ती - २००६

७) चंद्रकांत बांदिवडेकर - मराठी कादंबरी, चिंतन आणि समीक्षा
मेहता पब्लिकेशन पुणे १९८३

८) डॉ. केशव तुपे - साहित्याचे सांस्कृतिक संचित
साहित्य: सर्जन आणि संदर्भ
अभय प्रकाशन नांदेड

९) डॉ. नागनाथ कोत्तापले - साहित्याचा अन्वयार्थ,
मेहता पब्लिकेशन पुणे -१९९६

१०) डॉ. नागनाथ कोत्तापले - ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध
मेहता पब्लिकेशन पुणे - १९९३